जा क्र 7586/15

21 DEC 2015

**कार्यालयीन परिपत्रक क्र.४४३ दि.१९.१२.२०१५.**

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ४१ क क अंतर्गत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी मंजूर केलेल्या योजनेतील खंड क्र.१९ अन्वये धर्मादाय रुग्णालय तसेच धर्मादाय वैद्यकीय केंद्र यांचेकडून प्राप्त होणा-या अर्जांवर संबंधित धर्मादाय सह आयुक्त यांनी संबंधित तरतुदींनुसार कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आदेशाच्या प्रतीसह वेळोवेळी सादर करावा.

सदर परिपत्रकानुसार सर्व अधिनस्त जिल्हा कार्यालयांनी त्यांचे जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णालय व धर्मादाय वैद्यकीय केंद्र यांना योजनेतील खंड क्र.१९ अन्वये अर्ज करावयाचा असल्यास, त्यांनी संबंधित धर्मादाय सह आयुक्त यांचेकडे अर्ज करावा, असे कळवावे.

सोबत जोडलेल्या यादीनुसार योजनेतील खंड क्र.१९ खालील या कार्यालयात प्रलंबित असलेली प्रकरणे, त्यांच्या नावासमोरील धर्मादाय सह आयुक्त कार्यालय येथे पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव पाठविण्यात येत आहेत.

सदर यादीतील निरीक्षक अहवाल अप्राप्त प्रकरणांत, संबंधित जिल्हा कार्यालयांना अहवाल पाठविणेकरीता स्मरण करुन देण्यात आलेले आहे. सदर परिपत्रकानुसार, विचारणा केलेले अहवाल संबंधित धर्मादाय सह आयुक्त यांचेकडे त्या त्या जिल्हा कार्यालयांनी तात्काळ पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव पाठवावेत.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :

**धर्मादाय सह आयुक्त**,
मुख्यालय-१/मुख्यालय-२/बृहन्मुंबई/नाशिक/नागपूर/अमरावती/औरंगाबाद/लातूर/कोल्हापूर/ठाणे.

**सहायक धर्मादाय आयुक्त**,
ठाणे/रायगड/धुळे/नंदुरबार/जळगांव/चंद्रपूर/भंडारा/गोंदिया/वर्धा/गडचिरोली/अकोला/वाशिम/यवतमाळ/बुलडाणा/परभणी/हिंगोली/नांदेड/जालना/बीड/सोलापूर/उस्मानाबाद/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/सांगली/अहमदनगर/सातारा.

प्रत :

१. कार्यालयीन आदेश धारीणी.
२.धर्मादाय उप आयुक्त, मुख्यालय.
३.मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय्य सहायक.
४.रुग्णालय शाखा मुख्यालय.